# Year 2013-2014



महाराष्ट्र टाइम्स
प्रतिक्रियेसाठी nashik.letters@gmail.com

फोटो : सचिन मोरे

# मुलींना संरक्षण क्षेत्र खुले

## 'मटा'च्या सेमिनारमध्ये हर्षल आहेरराव यांचे विद्यार्थीनींना मार्गदर्शन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

'करिअरबरोबरच उत्तम पगार व जॉब सॅटीसफॅक्शन देणारे क्षेत्र म्हणजे संरक्षण क्षेत्र. पुरुषांसाठीच नव्हे तर महिलांसाठीही या क्षेत्रात अनेक संधी असून महिलांपर्यंत त्याची माहिती पोहोचणे आवश्यक आहे', असे मत सुदर्शन अॅकॅडमीचे संचालक हर्षल आहेरराव यांनी व्यक्त केले. 'महाराष्ट्र टाइम्स'मार्फत नाशिकरोडच्या बिंदू रामराव देशमुख महिला कॉलेजमध्ये (बीआरडी) त्यांनी या क्षेत्राबाबत विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

'महिला आणि संरक्षण क्षेत्रातील संधी' या विषयावर बीआरडी कॉलेजमध्ये सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हर्षल आहेरराव यांनी आर्मी, नेव्ही व एअरफोर्स या तिन्ही क्षेत्रातील महिलांना असणाऱ्या संधींबाबत माहिती दिली. संरक्षण क्षेत्रातील संधी विद्यार्थीनींपर्यंत पोहोचत नसल्यानेच विद्यार्थीनी या क्षेत्रापासून वंचित रहात असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. इंजिनीअरींग, लॉ यासारखे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कोणतीही परीक्षा न देता संरक्षण क्षेत्रातील काही जागांवर केवळ इंटरव्ह्यूच्या माध्यमातूनही प्रवेश मिळतो असे त्यांनी यावेळी सांगितले. आर्मी व एअरफोर्समध्ये काही पदांसाठी प्रवेश परीक्षा घेतल्या जातात तर नेव्हीमध्ये पाच दिवसांच्या इंटरव्ह्यूमध्ये निवड प्रक्रिया केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. अन्य क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणारा महिना पाच आकडी पगार त्यांना आकर्षित करतो; परंतु संरक्षण क्षेत्रातही असाच पगार विद्यार्थ्यांना मिळत असल्याची माहिती त्यांनी दिली. या क्षेत्रात महाराष्ट्रातील मुलींची संख्या कमी असून त्यांनी या क्षेत्रात येण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विद्यार्थीनींच्या शंकांचेही त्यांनी सेमिनारनंतर निरसन केले. कार्यक्रमाला कॉलेजचे प्रभारी प्राचार्य समीर लिंबारे, कॉलेजच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक डॉ. करुणा कुशारे उपस्थित तसेच विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

### संरक्षण क्षेत्रातील संधी

एअरफोर्समध्ये फ्लायिंग ब्रँच, टेक्निकल ब्रँच व ग्राऊंड ड्युटी ब्रँचमध्ये महिलांसाठी विविध संधी उपलब्ध आहेत. आर्मीमध्ये महिला टेक्निकल ऑफिसर, आर्मी सप्लाय कोर विभाग, आर्मी एयर डीफेन्स या विभागांमध्ये काम करु शकतात. नेव्हीमध्येही एअर ट्रॅफिक कंट्रोलर, एज्युकेशन ऑफिसर व लॉजिस्टीक ऑफिसर या पदांवर महिला काम करु शकतात.

### नेव्हीच्या इंटरव्ह्यूचे स्वरुप कसे आहे : भाग्यश्री गंधे

नेव्हीच्या इंटरव्ह्यूमध्ये प्रामुख्याने सायकॉलॉजी तसेच धाडसी वृत्तीची परीक्षा घेतली जाते. मोठ्या प्रमाणावर व्यायाम किंवा दमवणूक करणारी मैदानी खेळ अशी ही परीक्षा नसते. रिस्क घेण्याची तुमची तयारी, धाडस व मानसिकता यावर ही निवड चाचणी घेतली जाते.

### चष्मा असल्यास काय अडचण येते : हर्षदा जोशी

फिजीकल फिटनेसमध्ये एखादी मोठी समस्या असल्यास फिजिकल टेस्टदरम्यान निवड होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे चष्म्याच्या नंबर काय आहे यावर निवड अवलंबून आहे. तसेच कोणत्या पदासाठी निवड केली जात आहे यावरही ते अवलंबून आहे.

### पॅकेज अन् विविध भत्ते

लाखो रुपये खर्च करुन शिक्षण घेतल्यानंतर जसा पगार मिळतो त्याच प्रमाणात या क्षेत्रात केवळ एक परीक्षा पास झाल्यानंतर पगार मिळतो. सुरुवातीला महिन्याला ५० हजार रुपयांपासून पगार सुरु होतो. केंद्र सरकारचे विविध भत्तेही मिळतात. तसेच ट्रेनिंगदरम्यान २० ते २१ हजारांपर्यंत स्टायपेंडही मिळतो.

### कुटुंबियांसाठी सुविधा

किमान भाड्यामध्ये पोस्टींगच्या ठिकाणी चांगली राहण्याची व्यवस्था केली जाते. तुमच्यासह तुमच्या कुटुंबाला सरकारमार्फत मेडीकल सुविधा पुरविल्या जातात. जीवनावश्यक वस्तू कमी दरामध्ये संबंधित कॅन्टीनमध्ये उपलब्ध करुन दिल्या जातात.

दै. महाराष्ट्र टाईम्स 22/6/2013

1. Career Opportunity for Girls Defence Sector 2013



2. Trekking Camp 2013

# Year 2013-2014

सावित्रीबाई फुले पुणे विद्याप[illegible]

॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र. विकमं/२०१४–१५/७२८

दिनांक : १६/१२/२०१४.

प्रति,
मा. प्राचार्य,
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
सानेगुरुजी नगर जेलरोड, नाशिक रोड,
जि.नाशिक ४२२ १०१

**विषय** :– Trekking/Mountaineering camp for Female Students **शिबिराबाबत** ......

महोदय/महोदया,

वरील विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व आपले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने Trekking/Mountaineering camp for Female Students शिबिर आयोजन करण्यास आपणांस मान्यता देण्यात येत आहे. सदर शिबिर आयोजनासाठी आपल्या महाविद्यालयास रु. १८,०००/– पर्यंत अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त शिबिरासाठी होणारा जादा खर्च महाविद्यालयाने करावा.

मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ तसेच मा. जिल्हा समन्वयक यांचेशी विचारविनिमय करुन शिबिर कार्यक्रम रुपरेषा निश्चित करावी. सदर शिबिरासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांशी संलग्नित आपल्या महाविद्यालयाच्या परिसरातील सर्व महाविद्यालयांना/संस्थांना याबाबत पत्र पाठवून विद्यार्थिनीं पाठविण्याबाबत सूचित करण्यात यावे.

सदर शिबिर झाल्यानंतर १५ दिवसाचे आत हिशेब या विभागास सादर करावा. हिशेबा सोबत विद्यार्थ्यांची यादी, शिबिराचे फोटो, अहवाल सी.डी. मध्ये व मुळ स्वरुपात देण्यात यावा. [illegible] त्यासंबंधीची मुळ देयके मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

कळावे,

Dr. Kushare / Mrs Thambare

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिकरोड
आवक क्र. 227
दिनांक 29/12/2014

## 2. Report of Trekking Camp 2013

# Year 2013-2014

विद्यार्थी आरोग्य प्रबोधन

१. दिनांक २७/०१/२०१५ रोजी **स्त्री पुरुष संबंध संवेदशनशीलता** या विषयावर प्राचार्य श्री.विलास देशमुख यांचे व्याख्यान संपन्न झाले. यामध्ये २५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

२. दिनांक ०२ व ३ मार्च २०१५ रोजी विद्यार्थिनी आरोग्य प्रबोधन योजनेंतर्गत **हिमोग्लोबिन कॅम्प** आयोजित करण्यात आला. त्यात एकूण २६६ विद्यार्थिनींनी हिमोग्लोबिन तपासणी केली.

**महाविद्यालयाने स्वखर्चातून राबविलेले उपक्रम**

**i. वक्तृत्व कौशल्य विकसन कार्यशाळा**

सध्याचे विद्यार्थी अभ्यासात विशेष प्रगती करतात मात्र चारचौघांमध्ये स्वतःला व्यक्त करता येत नाही. संवाद साधता येत नाही त्यामुळे आत्मविश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे पदव्या प्राप्त करूनही मुलाखतीला चांगल्या पध्दतीने तोंड देता येत नाही. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व कौशल्य विकसनाच्या उद्देशाने विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे महाविद्यालयाने स्वखर्चातून एक दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. त्या कार्यशाळेत ज्येष्ठ नाटयकर्मी श्री. सदानंद जोशी, व्यवस्थापन तज्ज्ञ, यांनी वक्तृत्व स्पर्धेला व्यासपीठावर जाण्यापूर्वी या विषयावर मार्गदर्शन केले. शंतनुराव गुणे यांनी वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेसाठी वक्त्याची मानसिकता या विषयावर मार्गदर्शन केले. साहित्यिक श्री. शाम पाडेकर यांनी वादविवाद स्पर्धेची तयारी या विषयावर मार्गदर्शन केले.

**ii. युवा दौड -**

स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंती समारोहानिमित्ताने दि. ११ सप्टेंबर २०१३ रोजी भोसला मिलीटरी कॉलेज येथुन गंगापूर रोड-भोसला कॉलेज - तसेच महिला महाविद्यालय या मार्गावर युवा दौडचे आयोजन करण्यात आले होते. या दौड मध्ये नाशिकरोड परिसरातील महाविद्यालयाचे १००० विद्यार्थी सहभाग होते.

**iii. ट्रेकींग कॅम्प जाणीव जागृती व्याख्यान**

महाविद्यालयात जिल्हास्तरीय ट्रेकींग कॅम्प आयोजित करण्यात येणार होता. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये ट्रेकींग बाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी त्याचे महत्त्व कळावे या उद्देशाने नाशिकचे गिर्यारोहण तज्ज्ञ संजय अमृतकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**iv. जीवनशैली सप्ताह**

दि. २४ ते ३१ जानेवारी २०१४ या कालावधीत जीवनशैली सप्ताह साजरा करण्यात येतो. या अंतर्गतच हरितसाधक श्री. मंदार देशपांडे व अपूर्वा संचेती यांची मुलाखत श्री.पराग मांदळे यांनी घेऊन पर्यावरण -



## 2. Report of Trekking Camp 2013

# Year 2013-2014




**3. Save Girl Child Abhiyan Rally 2013**



## देशमुख महाविद्यालयात 'लेक वाचवा'चा जागर

सकाळ वृत्तसेवा


नाशिक, ता. १३ : स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी 'सकाळ'ने सुरू केलेल्या लेक वाचवा अभियानाला विविध संस्था, शाळा-महाविद्यालयांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभियानात नाशिक रोड येथील (कै.) बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयातील लेकींनी लेक वाचविण्याची शपथ घेतली.

मुलींनी स्वतःची निर्णयक्षमता वाढवून खंबीरपणे निर्णय घेतले पाहिजेत. स्त्रीभ्रूणहत्या थांबविण्यासाठी प्रत्येकाने स्वतःच्या घरापासून प्रयत्न करावेत. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जागृत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य ए. आर. [illegible] यांनी केले. या वेळी महाविद्यालयाच्या शीतल भोसले, मानिनी खिल्लारे, संचाली हिरे या विद्यार्थिनींनी स्त्रीभ्रूणहत्या [illegible]

नाशिक रोड : (कै.) बिंदू रामराव देशमुख महिला महाविद्यालयात 'लेक वाचवा' अभियानांतर्गत स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी शपथ घेताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

**3. News in Newspaper Save Girl Child Abhiyan Rally 2013**

# Year 2013-2014



जागर जाणिवांचा या सप्ताहात 'आहार जागृती' याविषयी मार्गदर्शन करताना डॉ. श्यामला सहस्त्रबुध्दे...

**4. Poshan Ahar Janiv Jagruti Karyakram 2014**

विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागर जाणिवांचा या अंतर्गत मूल्यशिक्षणासाठी स्वाभिमान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात पुढील व्याख्याने झाली.

| अ.क्र | तज्ज्ञांची नावे | व्याख्यान विषय |
|---|---|---|
| १. | डॉ. श्यामला सहस्त्रबुध्दे | आहार जागृती |
| २. | ऊर्जा मराठे | स्त्री पुरुष समानता |
| ३. | ॲड. मीनल खोहर | महिलांविषयक कायदे |
| ४ | प्रा. शरद साळवेकर | विवाहपूर्व समुपदेशन |
| ५. | प्रा. योगेंद्र पाटील | स्वरक्षणासाठी कराटे प्रात्यक्षिके |

**4. Report on Poshan Ahar janiv Jagruti Karyakram 2014**

# Year 2013-2014

२०१३-२०१४

i. लष्करात महिलांना संधी याविषयी श्री. हर्षल अहिरराव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

ii. महाबँक स्वयंरोजगार प्रशिक्षण योजनेचे संचालक श्री. सदाशिव पाटील यांचे स्वयंरोजगार प्रशिक्षण योजनांसंदर्भात मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

iii. विद्यार्थिनींना रोजगाराभिमुख कौशल्य प्राप्त व्हावे यासाठी महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभागातर्फे संगणकाचे प्रशिक्षण कोर्सेस बी.ए.पी या संगणक संस्थेत ७५ टक्के अनुदान उपलब्ध करुन दिले.या योजनेंतर्गत २६ विद्यार्थिनींनी टॅलीचे, १२ विद्यार्थिनींनी एम.एस.सी.आय.टी. व २ विद्यार्थिनींनी डीटीपी चे प्रशिक्षण घेतले. म्हणजेच एकूण ४० विद्यार्थिनींनी योजनेचा लाभ घेतला.

२०१४-२०१५

i. दिनांक १९/१२/२०१४ रोजी वाणिज्य विभाग व रोजगार केंद्रातर्फे सेवा ऑटो मोटिव्ह कंपनीकडून ७० विद्यार्थिनींच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी १४ विद्यार्थिनींची पुढील फेरीसाठी निवड झाली.

ii. दिनांक ०७/०१/२०१५ रोजी रोजगार केंद्रातर्फे गोविंद दंडे ॲण्ड सन्स तर्फे आयोजित २० विद्यार्थिनींच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी ०८ विद्यार्थिनींची डेटा एन्ट्री साठी निवड व नियुक्ती करण्यात आली.

iii. पार्कसाईड रिअल इस्टेट या कंपनीने महाविद्यालयात ३२ विद्यार्थिनींची नियुक्तीसाठी मुलाखत घेतली. त्यात ०६ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली.

iv. एम.के.सी.एल व समाजकल्याण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या संगणक प्रशिक्षणांतर्गत टॅली या प्रशिक्षण कार्यक्रमास एकूण शुल्काच्या एक तृतीअंश शुल्कात ०८ विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले.

v. बिग बझार तर्फे दिनांक २४ ते २६ जानेवारी २०१५ रोजी आयोजित केल्या गेलेल्या बचत महोत्सवात २० विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या. विद्यार्थिनींनी रोजगार व कार्यानुभव मिळविला.

- **व्यक्तिमत्व विकास**

i. विद्यार्थिनींसाठी '**स्वयंप्रकटीकरण**' या विषयावर श्री.शारदा शरणम सदसंघ, उल्हासनगर यांच्यातर्फे मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले. यामध्ये १०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

ii. दिनांक ०१ सप्टेंबर २०१४ रोजी विद्यार्थिनींना पोषण आहार सप्ताह जाणीव जागृती कार्यक्रमात आहाराचे महत्व पटवून दिले व सामुदायिक भोजन कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.



**4. Poshan Ahar janiv Jagruti Karyakram 2014**

# Year 2014-2015



**5. Nutrition Diet 2014**

# Year 2014-2015

## NATIONAL SERVICE SCHEME

**Activities conducted through out the Academic Year 2014-15**

Under the banner of National Service Scheme. The details are as follows :

- On 23rd July 2014, Tree Plantation Day was celebrated. The students gifted plants to the college.
- On 1st August 2014, Rakhi Tying Day was celebrated. The girls students tied Rakhies to the Teachers and Non-Teaching staff.
- On the same day Tribute was paid to Revolutioneers.
- On 15th August 2014, Independence Day was celebrated by Flag Hoisting. Cleanliness Campaign was conducted in the College Campus.
- On 28th June 2014, Elucation Competition was conducted. The topic was Social Awareness and Youth.
- On 7th September 2014, National Nutrition Day was celebrated.

**Special Winter Camp organized at Chandgiri (Dist. Nashik) from**

22nd to 28th December 2014.

Subject : **Cleanliness Campaign.** Total Volunteer 46 girls.

Outcome : Chandgiri Village Receive "Nirmal Gram Award"

Total Tree planted 300.

**Activities :**

- Cleanliness Campaign of the lake in the village.
- Health Check-up camp for villagers
- Street Plays about social issues.
- Cultural Activities

| Year | Subject | Resource Person |
|---|---|---|
| **December 2014** | | |
| 22/12/2014 | Jalsanwardhan (Water Management) | Mr. Raju Sanap |
| 23/12/2014 | Pradhan Mantri Jandhan Yojana | Dr. Sushma Hasabnis |
| 24/12/2014 | Organic Farming | Mr. Chaudhari (Farmer) |
| 25/12/2014 | Challenges in Indian Agricultures | Mr. Yogendra Patil |
| 25/12/2014 | Youth's Contribution for Society | Mr.. Nikam |
| 26/12/2014 | Historical Heritage | Dr. Karuna Kushare |
| 27/12/2014 | Women Empowerment | Mr.. Chandrakant Gosavi |
| 27/12/2014 | Leadership and NSS | Mr. Kakulate (NSS Coordinator, SPPU) |
| 27/12/2014 | Right To Education | Mr. Subhash Sawant |

**IQAC Coordinator**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Nashik Road-422 101

Leena Pandhare
**PRINCIPAL**
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

# 5. Report on Nutrition Diet 2014

## Year 2014-2015



**6. Swatchha Bharat Abhiyan**




**7. Importance of Breast feeding**

# Year 2014-2015

विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागर जाणिवांचा या अंतर्गत मूल्यशिक्षणासाठी स्वाभिमान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात पुढील व्याख्याने झाली.

| अ.क्र | तज्ज्ञांची नावे | व्याख्यान विषय |
|---|---|---|
| १. | डॉ. श्यामला सहस्त्रबुध्दे | आहार जागृती |
| २. | ऊर्जा मराठे | स्त्री पुरुष समानता |
| ३. | ॲड. मीनल खोहर | महिलांविषयक कायदे |
| ४ | प्रा. शरद साळवेकर | विवाहपूर्व समुपदेशन |
| ५. | प्रा. योगेंद्र पाटील | स्वरक्षणासाठी कराटे प्रात्यक्षिके |

**iii) आधूनिक तरूणीपुढील आव्हाने- व्याख्यान**

महाविद्यालयात राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांचे 'तरुणीपुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान इ. कार्यक्रम संपन्न झाले.

**२०१४-१५ या वर्षात विद्यापीठाकडून पाठविण्यात आलेल्या परिपत्रकांची पुढीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आले आहे.**

iv) मा.पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी घोषित स्वच्छता अभियानात दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ रोजी परिसरात विद्यार्थिनींनी स्वच्छता मोहिम राबविली. यामध्ये ८० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. (विद्यापीठ परिपत्रक )

v) दिनांक २३/१२/२०१४ रोजी ' जैवविविधता ' (Bio Diversity) या विषयावरील आयोजित प्रदर्शनास (National Science Train)महाविद्यालयातील ८२ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. (विद्यापीठ परिपत्रक )



## 8. Report on Womens Health Problems and Cleanliness

## 9. Pre-Marriage Counselling

## 10. Nirbhay Kanya Abhiyan

# Year 2014-2015

२०१३-२०१४

महविद्यालयाच्या प्रथम वर्ष कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींसाठी आरोग्य तपासणी आयोजित करण्यात आली होती. या आरोग्य तपासणीत डॉ. सहस्त्रबुध्दे व डॉ.राजदेरकर यांनी सहकार्य केले. या वैद्यकीय तपासणीत अनेक विद्यार्थिनींना डोळयाचे विकार निदर्शनास आले.

विद्यार्थिनींना वैद्यकीय मार्गदर्शनासाठी महविद्यालयात डॉ. शुभांगी टोपे यांचे महिला आरोग्य याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

२०१४-२०१५

दिनांक १८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०१४ या कालावधीत प्रथम वर्ष वाणिज्य व कला शाखेच्या **३१५** विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी डॉ.शामला सहस्त्रबुध्दे यांनी केली. अनेक विद्यार्थीनीचे मासिक पाळी व अशक्तपणा या संदर्भात विकार दिसून आले. दिनांक १८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०१४ या कालावधीत प्रथम वर्ष वाणिज्य व कला शाखेच्या **३१५ विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी** डॉ.शामला सहस्त्रबुध्दे यांनी केली.

**बाल व माता आरोग्य तपासणी**

सामाजिक दायित्त्वाच्या भूमिकेतून चांदगिरी या गावातील बालकांचे आरोग्य तपासण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातर्फे बाल व माता आरोग्य तपासणी घेण्यात आली.


**थॅलेसेमिया तपासणी व प्रबोधन**

१. दिनांक ०२ जानेवारी २०१५ रोजी **थॅलेसेमिया तपासणीसाठी** २१५ विद्यार्थिनींची **रक्त तपासणी** करण्यात आली. या चाचणीच्या अहवालावरुन ०४ विद्यार्थिनी थॅलेसेमिया ग्रस्त असल्याचे निदर्शनास आले. त्यांना पुढील समुपदेशन व औषधांसाठी नाशिक येथे पाठविण्यात आले.
२. डॉ.सुधा डुबरे यांनी **स्त्री शरिराची स्वच्छता** या विषयी मार्गदर्शन केले. त्यात कंपनीकडून मोफत औषधे वाटप करण्यात आले.
३. डॉ.विभा कोमावार,डॉ.लोढा,डॉ.पाठक यांनी स्त्री आरोग्यात स्तनपानाचे महत्व या विषयावर स्लाईड शो द्वारे मार्गदर्शन केले. **मासिक पाळीत घ्यावयाची काळजी** या विषयावर मार्गदर्शन केले. जवळजवळ ८० विद्यार्थिनींनी यामध्ये सहभाग घेतला.
४. महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता या संदर्भात इमामी लिमिटेड या कंपनी तर्फे डॉ.खैरे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले तसेच **मासिक पाळी संदर्भात होणारे आजार व घ्यावयाची काळजी** याबद्दल मार्गदर्शन केले. कंपनी तर्फे सॅनेटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.



## 8. Womens Health Problems And Cleanliness

## Year 2014-2015



जागर जाणिवांचा या सप्ताहात 'विवाहपूर्व समुपदेशन याविषयी मार्गदर्शन करताना प्रा. शरद साळवेकर.

**9. Pre-Marriage Counselling**

## Year 2015-2016



**10. Nirbhay Kanya Abhiyan**



**11. Nirbhay kanya Abhiyan**

# Year 2015-2016



12. Swatchha Bharat Abhiyan




स्वच्छ भारत अभियान -

महाविद्यालयाच्या स्वच्छतेत विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला.14 ऑगस्ट, 2015 ,2 ऑक्टोबर,2015 व 12 जानेवारी,2016 स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यात वर्ग खोल्या स्वच्छ करणे,महाविद्यालयातील जाळे काढणे,प्लास्टिक पिशव्या उचलणे,परिसर स्वच्छ करणोशा पद्धतीने स्वच्छता करण्यात आली.

13. Plastic Free Abhiyan And Swatccha Bharat

# Year 2015-2016



## 14. Mahatma Gandhi Jayanti

# Year 2015-2016



15. Clean India Healthy India

16. **जागतिक महिलादिन**: ८ मार्च रोजी महिला दिन साजरा करण्यात आला.त्य निमित्ताने सौ, विद्‌या भट यांचे विविध भाषेतील करिअर या विषयावर व्याख्यान झाले. त्यांचे जर्मन भाषेवर प्रभुत्व आहे. त्यातून त्यांना संधी कशी मिळाली याबाबत त्यांनी कथन केले.

16.International Womans Day

# Year 2016-2017




## 17. Swachha Bharat Abhiyan




## 18. Beti Bachao Beti Padhao

# Year 2016-2017

## ४.२ स्वच्छ भारत पंधरवडा

नोव्हेंबर१ ते १५ नोव्हेंबर: याकालावधीत दीपावली सुटी  होती तरी विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय संयुक्त  विद्यमाने महाविद्यालय परिसर व सभोवतालचा परिसर स्वच्छ केला.

Leena Pandhare

प्राचार्या
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

**20.Swachhata Bharat Pandharwada**

# Year 2016-2017



21.Worls Aids Day

## Year 2016-2017

दि २४/७/२०१६.

* निर्भय कन्या अभियान *





## 22.Nirbhay Kannya Abhiyan

**Year 2017-2018**



**23.Swachha bharat Abhiyan on Historical place**



**25. Youth Week –Lectures Swachha Bharat Abhiyan, Cotton Bag Distribution**

# Year 2017-2018

• एकदिवसीय निर्भय कन्या अभियान -



• दिनांक 15 जानेवारी, 2017 रोजी महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान घेण्यात आले.या अभियानाचे उद्घाटन प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.निवेदिता पवार यांच्या हस्ते झाले.पोलीस निरीक्षक श्रीमती नम्रता देसाई यांनी सामाजिक सुरक्षा या विषयावर तर प्रसिद्ध कराटे कोच कु.चेतना शर्मा यांनी कराटे मार्गदर्शन केले.यात 97 विद्यार्थीनींनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

• दिनांक 23 जानेवारी रोजी एकदिवसीय निर्भय कन्या अभियान आयोजित करण्यात आले.यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.मिनाक्षी गवळी उपस्थित होत्या,त्यांनी योग आणि मानसिक निर्भयता या विषयावर तर चेतना शर्मा यांनी कराटेचे प्रात्यक्षिक दाखविले आणि स्त्रीविषयक कायदे या विषयावर विद्यार्थीनींशी संवाद साधला.

## 26. Report on Nirbhay Kannya Abhiyan

जागतिक महिला दिन विशेष

सकाळ TODAY

# बचतगटाच्या चळवळीतून महिला झाल्या सक्षम

YOUNG INSPIRATORS NETWORK

## अश्विनी बोरस्ते : महिला दिनानिमित्त 'सकाळ यिन संवाद'

सकाळ वृत्तसेवा

नाशिक रोड, ता. ८ : घरातील जबाबदारी सांभाळून बचतगटाच्या चळवळीतून सामाजिक काम उभे केले. त्यातून अनेक महिलांना रोजगार व आर्थिक पाठबळ मिळाल्याने महिला सक्षम झाल्या आहेत, असे प्रतिपादन माजी नगरसेविका अश्विनी बोरस्ते यांनी केले.

नाशिक रोड येथे (कै.) बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 'सकाळ यिन संवाद' कार्यक्रमांतर्गत महिला दिनानिमित्त झालेल्या व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्राचार्या डॉ. लीना पांढरे, सांस्कृतिक विभागप्रमुख स्मिता माळवे, 'यिन' मुख्यमंत्री तेजस पाटील, गणेश जगदाळे, मीनल बर्वे, स्मिता माळवे, डॉ. करुणा कुशारे, डॉ. डी. के. होळकर, डॉ. एस. आर. हसबनीस, प्रा. जीवन साळुंके आदी उपस्थित होते.

सौ. बोरस्ते म्हणाल्या, की शिक्षण घेण्यासाठी वयाची अट नसते. बचतगटाच्या चळवळीला शैक्षणिक गुणवत्ता जोडण्यासाठी पीएच. डी. करीत आहेत. महिलांना आर्थिक, सामाजिक, मानसिक दृष्टीने सक्षमीकरण झाले पाहिजे. विद्यार्थिदशेतून बाहेर पडल्यानंतर अनेक संकटांना सामोरे जावे लागते. त्यासाठी महाविद्यालयात शिक्षणातूनच मुलींना सक्षम केले पाहिजे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, सुप्रिया सुळे, (स्व.) आर. आर. पाटील यांच्या माध्यमातून सहकार चळवळीतून आज बचतगटांची संस्था उभी राहिली. त्यात ८०५ बचतगट, एक हजार ७०० संघटन, १४ हजार शेअर्स व शून्य टक्के थकबाकी असलेली संस्था आहे. महिलांनी कर्तृत्व सिद्ध केले, तर आदराचे स्थान मिळते. बचतगटाच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली असून, नाशिकच्या पापडांना परदेशात मागणी आहे. महिलांनी पापड, लोणचे यातून बाहेर पडून नावीन्यपूर्ण उत्पादन केले पाहिजे. प्राचार्या डॉ. लीना पांढरे यांनी प्रास्ताविक केले. स्मिता माळवे यांनी सूत्रसंचालन केले. 'यिन'च्या प्रतिनिधी निशा सोनवणे यांनी आभार मानले.





नाशिक रोड : (कै.) बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 'सकाळ यिन संवाद' कार्यक्रमांतर्गत महिला दिनानिमित्त गुरुवारी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना अश्विनी बोरस्ते. शेजारी प्राचार्या डॉ. लीना पांढरे, 'यिन' मुख्यमंत्री तेजस पाटील, गणेश जगदाळे, स्मिता माळवे आदी.. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित विद्यार्थिनी.

## 27. Mahila Din